# 'आयएल ॲण्ड एफएस इन्फ्रा असेट'ची ७.५० अब्ज उभारणी

मुंबई : आयएल ॲण्ड एफएस इन्फ्रास्ट्रक्चर डेब्ट फंडाच्या (आयआयडीएफ) व्यवस्थापनासाठी आयएल ॲण्ड एफएस फायनान्शियल सर्व्हिस लिमिटेडने (आयएफआयएन) स्थापन केलेल्या आयएल ॲण्ड एफएस इन्फ्रा ॲसेट मॅनेजमेंट लिमिटेडने (आयआयएएमएल) या पहिल्या क्लोज एन्डेड फंडासाठी ७.५० अब्ज रुपये उभारले. आयआयडीएफ मालिकेमध्ये १ए, १बी आणि १सी यांचा कालावधी अनुक्रमे ५, ७ आणि १० वर्षे आहे. अशा प्रकारे पायाभूत विकासासाठीच्या कर्जरोखे फंडाद्वारे गुंतवणूकदारांकडून मोठी रक्कम उभारण्यात यश मिळवणारी देशातील ही पहिली योजना आहे.